अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.१० फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## जाडेजा-अश्विनची जादू, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव आटोपला

सुराज्य/नागपूर

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात नागपुरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या मैदानात पहिला कसोटी सामना सुरु आहे. दरम्यान पहिल्या सामन्यातील ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १७७ धावांवर आटोपला आहे.

भारतीय गोलंदाजांनी उत्कृष्ट गोलंदाजी करत ही कमाल केली आहे. यावेळी जाडेजा आणि अश्विन यांनी मिळून तब्बल ८ विकेट्स घेतले आहेत. तर शमी-सिराज यांनी प्रत्येकी एक-एक विकेट घेतली. जाडेजाने ५ विकेट्स एका डावात घेण्याची कमाल केली आहे. त्यानंतर फलंदाजीला आल्यावर कॅप्टन रोहित आणि केएल राहुल यांनी अर्धशतकी भागिदारी केली. राहुल २० धावा करुन बाद झाला. तर रोहित शर्मा नाबाद ५६ आणि आर अश्विन नाबाद शून्य धावांवर क्रिजवर आहे. सामन्यात सर्वात आधी नाणेफेक जिंकून ऑस्ट्रेलियाने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. एक मोठी धावसंख्या पहिल्या डावात करण्याची ऑस्ट्रेलियाची रणनीती होती. पण भारताने अप्रतिम गोलंदाजी केली. सामन्यात भारताकडून अगदी सुरुवातीपासूनच चांगली गोलंदाजी सुरु होती. दोन्ही सलामवीरांना शमी आणि सिराजनं बाद केलं. पण त्यानंतर भारताच्या फिरकीसमोर ऑस्ट्रेलियाचे ८ गडी काही वेळातच बाद झाले.



# पटोलेंच्या नाऽऽ नाऽऽमुळे महाविकास आघाडीची उडाली दैना

## ●‘सामना‘ने फोडली वाचा, काँग्रेसवाल्यांचे सुटले तोंड

सुराज्य/सोलापूर

**सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वाधिक चर्चेत असलेले नाव म्हणजे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले. नुकत्याच पार पडलेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीतील ‘राजकारण‘मुळे हे नाव अधिकच चर्चेत आले. ती चर्चा संपते न संपते तोच शिवसेने(ठाकरे गट)चे मुखपत्र असलेल्या ‘सामना’च्या अग्रलेखाने नाना पटोलेंनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळेच महाविकास आघाडी सरकार पडले, असे भाष्य करून सत्तांतर नाट्याला पुन्हा एकदा तोंड फोडले. त्यानंतर याच मुद्यावरून काँग्रेस नेत्यांनीही तोंड सोडले आणि राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे यांनीही हीच ‘तोंड पाटीलकी’ बरोबर असल्याचे म्हटल्यानंतर नानांचे नाव पुन्हा एकदा जुन्या प्रकरणात नव्याने चर्चेला आले आहे.**



त्याचे झाले असे की, शिवसेना ठाकरे गटाचे मुखपत्र असणाऱ्या ‘सामना’ वृत्तपत्राने गुरुवारच्या अंकात प्रसिध्द केलेल्या अग्रलेखामध्ये थोरात-पटोले वादावर भाष्य केले आहे. पटोले महाविकास आघाडी सरकार असताना विधानसभेचे अध्यक्ष होते. त्यावेळी त्यांनी तडकाफडकी राजीनामा दिला. त्यानंतर राज्यपालांनी विधानसभा अध्यक्षांच्या निवडीचा मार्ग रोखला. त्यातच शिवसेनेत बंड झाले. त्यावेळी पटोले विधानसभा अध्यक्ष असते तर बंडखोरांना अपात्र ठरवून त्यांना सरकार वाचवता आले असते. सरकार वाचले असते तर नुकताच उद्भवलेला ‘थोरात-पटोले वाद’ उद्भवलाच नसता, असे स्पष्टीकरण या अग्रलेखातून करण्यात आले आहे. त्यानंतर शिवसेनेचे खा. संजय राऊत यांनीही माध्यमांशी बोलताना हाच मुद्दा पुढे रेटला आहे. त्यावरून नव्या चर्चेला वाचा फुटली आहे. त्यातून नाना पटोले हे पुन्हा एकदा चर्चेचा केंद्रबिंदू ठरले आहेत.

**राजीनामा दिला नसता तर सरकार टिकले असते :** नाना पटोले यांनी विधानसभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता. नवीन अध्यक्षांची निवड झाली नाही. त्यामुळे महाविकास आघाडी सरकारला सत्तेवरून पायउतार व्हावे लागले. त्यावेळी नानाभाऊंनी राजीनामा दिला नसता तर हे सरकार टिकले असते, अशा सर्वांच्या भावना होत्या, अशी प्रतिक्रिया काँग्रेसनेते विजय वडेट्टीवार यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या भेटीनंतर दिल्लीत व्यक्त केली.

**अन्यथा हे घडलेच नसते :** महाविकास आघाडीमध्ये या विषयावर चर्चा व्हायला हवी होती. वास्तविक नाना पटोले यांनी त्यावेळी अध्यक्ष पद सोडायला नको होते. त्यांनी जर अध्यक्षपद सोडले नसते तर हे सर्व घडलेच नसते. मात्र, आता यावर सार्वजनिक चर्चा करणे योग्य नाही. आमच्या पातळीवर आम्ही चर्चा करू. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांवर मी जास्त बोलू शकत नाही, अशी प्रतिक्रिया विधानसभेचे माजी अध्यक्ष राष्ट्रवादीचे नेते दिलीप वळसे-पाटील यांनी व्यक्त केली.

**मित्रपक्षाच्या निर्णयाचा मान राखावा :** पटोलेंच्या राजीनाम्याचा निर्णय काँग्रेसच्या तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया गांधी यांच्या सूचनेनुसारच घेतला होता. आघाडीचा धर्म पाळत मित्रपक्षाच्या निर्णयाचा शिवसेनेने मान राखायला हवा, पटोले यांच्या राजीनाम्यामुळेच महाविकास आघाडी सरकार अडचणीत आले असे म्हणणे योग्य नाही. ‘जर-तर’ ला राजकारणात काहीच अर्थच नसतो, असे सांगत काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पक्षाची बाजू उचलून धरली.

**काँग्रेसमध्ये बदलाचे वारे? :** दरम्यान, वडेट्टीवार मल्लिकार्जुन खर्गेंना भेटायला दिल्लीत गेल्यामुळे ही भेट राज्यातल्या काँग्रेस पक्षांतर्गत सुरू असलेल्या राजकीय घडामोडींबाबत असावी, असे म्हटले जात आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी विधिमंडळ पक्षनेतेपदाचा राजीनामा दिल्यामुळे पक्षात बदलाचे वारे वाहू लागले आहेत. ही भेट देखील त्याचा एक भाग असल्याची चर्चा सुरू आहे.

---

## स्काडा नियंत्रण प्रणालीच्या कामास आजपासून सुरुवात

▶ प्रथम उजनी लाईन, पाकणी व एमबीआर येथील काम घेणार हाती

### २५ दिवसात कामासाठी राहणार शटडाऊन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत स्काडा नियंत्रण प्रणालीचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी शुक्रवार, १० फेब्रुवारीपासून कामात सुरुवात करण्यात येत आहे. २५ दिवस हे काम चालणार आहे. पहिल्याच दिवशी उजनी लाईन पाकणी व एमबीआर येथील काम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती महापालिका शहर पाणीपुरवठा वितरण अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.

सोलापूर स्मार्ट सिटी योजनेंतर्गत स्काडा नियंत्रण प्रणालीचे काम प्रगतिपथावर आहे. उजनी जलवाहिनी, पाकणी जलशुद्धीकरण केंद्र, सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्र, भवानी पेठ जलशुद्धीकरण केंद्र व टाकळी जलवाहिनी येथे विविध प्रकारचे उपगांची कामे प्रस्तावित आहे. सोनी इंटरप्राईज या कंपनीमार्फत हे काम करण्यात येत आहे. ही कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी शटडाऊन राहणार आहे. यामुळे सोलापूर शहरातील पाणीपुरवठा १० फेब्रुवारी २०२३ ते पुढील २५ दिवसापर्यंत ३ ऐवजी ४ दिवसानंतर होणार आहे. ४ दिवसाआड होणाऱ्या पाणी पुरवठ्यात कोणताही बदल होणार नाही,असे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी पासून या कामास सुरुवात करण्यात येत आहे. पहिल्याच दिवशी उजनी लाईन वरील काम करण्यात येणार आहे. पाकणी आत आणि बाहेर तसेच एमबीआर येथीलही काम हाती घेण्यात येणार आहे. दोन आउटलेटचे कामही करण्यात येत असून मीटर आणि व्हॉल्व्ह बसविण्यात येणार आहे. या सर्व कामासाठीचे टेस्टिंग झाले आहे. सर्व यंत्रणा सज्ज आहे, असे महापालिका शहर पाणीपुरवठा वितरण अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

**पाण्याचा वापर काटकसरीने करावा : कारंजे**

या कामासाठी वेळोवेळी शटडाऊन राहणार असून या कालावधीत पाणी पुरवठा चार दिवसआड नंतर देखील उशीरा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

**कामासंदर्भात अनेक सवाल उपस्थित**

नियोजनाच्या अभावातून शहराला वेठीस धरण्याचा हा प्रकार असल्याचा आरोप होत आहे. मक्तेदाराकडून कामाच्या नियोजनाचा आराखडा तयार केला आहे का? संबंधित मक्तेदाराची कामाची क्षमता आहे का? या कामासाठी लागणारी मशिनरी, वेल्डिंग मशीन तितक्या उपलब्ध आहेत का? असतील तर २५ दिवस शहराला का वेठीस धरले जात आहे?. महापालिकेने या पाण्यासाठी जलसंपदा विभागाकडे पैसे अदा केले आहेत. त्यामुळे पंप जास्त वेळ बंद राहिल्यास पाणी वाया जाणार असल्याचेही बोलले जात आहे.

---

▶ शहाजीबापू पाटील यांच्या ताफ्यातील

## पोलीस गाडीच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

सांगोला : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे आ.शहाजीबापू पाटील यांच्या ताफ्यातील पोलिसांच्या स्कार्पिओ गाडी (एमएच १३, डी एम ९४४०) ला स्प्लेंडर मोटरसायकल (एमएच ४५ ए जे ६३३०) चा अपघात झाला आहे.

या अपघातात दुचाकिस्वार अशोक नाना वाघमारे (वय ५० रा. माडगुळे, ता.आटपाटी, जि.सांगली) हा जागीच ठार झाला असून, नानासो बिरा आमुने (वय ४० रा. एखतपूर, ता.सांगोला) हा गंभीर जखमी झाला. त्याची प्रकृती चिंताजनक आहे. आमदार पाटील यांच्या ताफ्यातील कोणालाही दुखापत झालेली नाही. याबाबत मिळालेली माहिती अशी की, आमदार शहाजीबापू पाटील हे नाझरा येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरासाठी गेले होते. शिबिराचा कार्यक्रम आटोपून ते सांगोल्याकडे येत होते. त्यांच्या वाहनाच्या पुढे पोलिसांची गाडी होती. नाझरा ते नाझरामठ या रस्त्यावर बोराटेवाडी येथे गुरुवारी साडेचारच्या सुमारास अशोक वाघमारे व नानासो आमुने हे मोटरसायकलवरून माडगुळेकडे चालले असताना ताफ्यातील स्कार्पिओ गाडीला मोटरसायकल धडकली. अपघात एवढा भयंकर होता की, दुचाकीने पोलिसांच्या गाडीला समोरून जोराची धडक दिल्याने एकाचा तडफडून मृत्यू झाला.



---

## महाराष्ट्रावर राष्ट्रपती राजवटीचे सावट?

मुंबई : राज्यात शिंदे-फडणवीस सरकार आणि विरोधक यांच्यात राजकीय गदारोळ सुरू असतानाच गुरूवारी एक खळबळजनक राजकीय भाकित वर्तवले गेले.पुढच्या आठवड्यात यदाकदा सुप्रीम कोर्टाचा निकाला लागला तर महाराष्ट्रावर राष्ट्रपती राजवट लागू शकते तसेच कसबा आणि चिंचवड निवडणुका बरखास्त होतील, असे शक्यता या भाकितात सांगितली गेल्या सत्ताधारी पक्षातील नेत्यांच्या पायांना ‘बळबळ’ आली आहे.

त्याचे असे की, पुण्यातील कसबा पेठ आणि चिंचवड पोटनिवडणुकीवरून राजकारण रंगले आहे. निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली असून प्रचारही सुरू झाला आहे. सत्ताधारी पक्ष आणि महाविकास आघाडी यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. अशातच कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी मोठे विधान केले आहे.

महाराष्ट्रत सुरू असलेल्या सत्ता संघर्षाचा निकाल अजून सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. प्रामुख्याने सत्ताधारी गोटातील १६ आमदारांच्या अपात्रतेच्या प्रकरणी येत्या १४ फेब्रुवारीला निर्णय लागण्याची शक्यता आहे. जर हे आमदार अपात्र ठरले, तर विधानसभा बरखास्त होऊ शकते. आणि असे झाले तर कसबा आणि चिंचवडच्या पोट निवडणुका बरखास्त होतील, असे सरोदे म्हणाले.

---

## बार्शी येथील आरोग्य अधिकाऱ्यांचे कार्यालय फोडले

सुराज्य/बार्शी

येथील जवाहर हॉस्पिटलच्या आवारात असलेल्या तालुका आरोग्य अधिकाऱ्याच्या कार्यालयाचा दरवाजा तोडून चोरट्याने दोन प्रिंटर पळविले. ही चोरी बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली. या घटनेची फिर्याद छाया मारुती मोराळे (रा.बार्शी) यांनी बार्शी पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला. चोरीस गेलेल्या दोन प्रिंटरची किंमत २४ हजार रुपये इतकी असल्याची नोंद पोलिसात झाली. हवालदार चौगुले पुढील तपास करीत आहेत.

---

## करणीधरणीच्या संशयावरून चुलतीवर हल्ला

पंढरपूर : करणी धरणी केल्याच्या संशयावरून चुलतीच्या डोक्यावर पहारीने हल्ला करून गंभीर जखमी करण्यात आले.ही घटना खर्डी (ता.पंढरपूर) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. सिंधुताई धोंडीबा रोंगे (वय ५९ रा.खर्डी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांना गंभीर अवस्थेत पंढरपूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या प्रकरणात त्यांचा पुतण्या अमोल शंकर रोंगे यांच्या विरुद्ध पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सिंधुबाई रोंगे या मंगळवारी सकाळी आपल्या वस्तीवर काम करीत होत्या. त्यावेळी त्यांचा पुतण्या तू माझ्यावर करणी केली. त्यामुळे माझे नुकसान झाले. आता तुला जिवंत सोडत नाही. खल्लास करतो असे म्हणून लोखंडी पहारीने त्यांच्या डोक्यात हल्ला केला. अशी नोंद पंढरपूर तालुका पोलिसात झाली. हवालदार वाडेकर पुढील तपास करीत आहेत.

---

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



येरे माझ्या मागल्या!!!

| कल्याण |
|---|
| 100-11-470 |

| मेन बाजार |
|---|
| ---------- |

---

## जयंत पाटील यांच्या पंढरपूर दौऱ्यापूर्वी राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्षांचा राजीनामा

सुराज्य/पंढरपूर


**राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना पंढरपूर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयसिंह देशमुख यांनी आपल्या पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे पंढरपूर मंगळवेढा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का मानला जात आहे.**

विजयसिंह देशमुख यांना कासेगाव परिसरात मानणारा मोठा वर्ग आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील महत्त्वाचे गाव आहे. विजयसिंह देशमुख त्यांच्या जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा फटका बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्वर्गीय आमदार भारत नाना भालके यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख होती. स्व भारत नाना भालके यांच्या नंतर नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली होती विधानसभा पोट

### लवकरच भाजपात प्रवेश

निवडणुकीनंतर भगीरथ भालके आणि त्यांच्यामध्ये फारसे सख्य राहिले नव्हते. त्यातच गेल्या काही दिवसापासून विजयसिंह देशमुख हे भाजप आमदार समाधान आवताडे यांच्यासोबत स्नेह वाढवला आहे. लवकर त्यांचा भाजपात प्रवेश होणार असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या महिन्यात विजयसिंह देशमुख यांनी आमदार आवताडे यांना पुन्हा आमदार करण्यासाठी काम करणार असल्याचे जाहीर सभेतून सांगितले होते. आमदार अवताडे यांनी कासेगाव परिसरात कोट्यवधी रुपयांचा निधी दिल्यामुळे त्यांनी आभाराचे फ्लेक्स लावले होतो.



विजयसिंह देशमुख यांनी राजीनामा दिल्यानंतर याचा मोठा फटका राष्ट्रवादी काँग्रेसला अर्थातच भगीरथ भालके यांना बसणार आहे. मंगळवेढा येथील स्व भारत नाना भालके यांचे स्वीय सहाय्यक रावसाहेब पाटील यांनी नुकताच अवताडे यांच्या गटात प्रवेश केला आहे. आमदार अवताडे यांनी भालके यांचे कार्यकर्ते गळाला लावण्याचा सपाट लावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि सोलापूर जिल्हा अध्यक्ष बळीराम काका साठे यांना भेटून मी माझ्या पदाचा राजीनामा देत असल्याची माहिती विजयसिंह देशमुख यांनी सुराज्यशी बोलताना सांगितली आहे.

**कल्याणराव काळे यांच्याकडून गटाबाजीवर पांघरून घालण्याचा प्रयत्न**

वसंतराव काळे यांच्या जयंतीनिमित्त आज शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पंढरपूरला येणार आहेत. कल्याणराव काळे यांनी भाजपच्या वाटेवर असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विजयसिंह देशमुख यांचे नाव निमंत्रण पत्रिकेमध्ये टाकले आहे. पंढरपुरात सारख काही अलबेल असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न कल्याणराव काळे यांनी केला आहे. सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याची निवडणूक काही दिवसांवर आली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस मधील माजी तालुकाध्यक्ष दीपक पवार वगळता सर्व गटांना त्यांनी एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला आहे.